## स्वतंत्र विदर्भासाठी जनआंदोलन

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ९ जून :** स्वतंत्र विदर्भाच्या मागणीसाठी ९ आणि १० जून रोजी बॅरि. राजाभाऊ खोब्रागडे पुतळा परिसरात विदर्भ मुक्ती मोर्चा आणि विदर्भ मुक्ती युवा मोर्चा तर्फे दोन दिवसांचे धरणे आंदोलन आयोजित केले असल्याची माहिती विदर्भ मुक्ती मोर्चाचे किशोर पोतनवार यांनी पत्रकार परिषदेत दिली. ते पुढे म्हणाले की, १९९७ मध्ये भुवनेश्वर येथील राष्ट्रीय अधिवेशनात भाजपने स्वतंत्र विदर्भाचा ठराव एकमताने मंजूर केला होता. जांबुवंतराव सोबत विदर्भातील भाजप नेते रस्त्यावर उतरले होते. भाजप सत्तेत येताच विदर्भ स्वतंत्र केल्या जाईल असे सांगितले पण आज ते निष्क्रिय आहेत. जांबुवंतराव धोटे, राजे विश्वेश्वरराव महाराज, टी.जी. देशमुख, आदि नेते होते.

## गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार सोहळा

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ९ जून :** इयत्ता १० वी व १२ वी मध्ये शाळा, तालुका, जिल्हा , विभागातून प्रथम येणाऱ्या अनुसुचित जातीच्या विद्यार्थ्यांस राजश्री छत्रपती शाहु महाराज गुणवत्ता पुरस्कार योजनेद्वारे अनुक्रमे ५ हजार, १० हजार, २५ हजार, ५० हजार रुपये गुणवत्ता पुरस्कार देण्यात येतो. योजनेचा लाभ घेण्याकरीता संबंधित शाळा कनिष्ठ महाविद्यालय यांनी सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, चंद्रपुर या कार्यालयाकडे प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे. प्रस्तावासोबत विद्यार्थ्यांचे जात प्रमाणपत्र, गुणपत्रिका, बँक पासबुकची झेरॉक्स, आधार कार्ड व टी.सी. सादर करावे.

# दुचाकी अपघातात माय लेकीचा करुण अंत







**महासागर तालुका प्रतिनिधी**

**राजुरा, दि. ९ जून :** बल्लारपूर - राजुरा दरम्यान निर्माणाधिन राष्ट्रीय महामार्गावर अज्ञात ट्रकने दुचाकीला दिलेल्या जबर धडकेत राजुरा येथील तरुणी व तिच्या आईचा जागीच मृत्यू झाल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

येथे वारंवार होत असलेल्या अपघात व मृत्यूमुळे परिसरातील नागरिकांत राष्ट्रिय महामार्गाच्या कार्यावर तीव्र रोष व्यक्त होत आहे.

राजुरा येथील पेठ वार्डातील ज्योती बंडू रागीट (४२) व त्यांची मुलगी सेजल बंडू रागीट या दोघीही MH 34 BN ५५३८ क्रमांकाच्या दुचाकीने राजुरा येथुन बल्लारपूर कडे जात असताना वर्धा नदीचा पुल ओलांडल्यावर जलाराम बाप्पा मंदिराजवळ अज्ञात ट्रक ने दुचाकीला धडक दिल्याने माय लेकी जागीच ठार झाल्या.

घटनेची माहिती कळताच पोलिसांनी घटनास्थळ गाठले असून मृतांचे शव उत्तरीय तपासणीसाठी रुग्णालयात पाठविण्यात आले.

बामणी - राजुरा ते आदिलाबाद या राष्ट्रिय महामार्गाचे विस्तारीकरणाचे काम सूरू आहे. रस्त्याची उंची वाढविण्याकरीता मातीचे ढिगारे टाकण्यात आले. कुठल्याही प्रकारचे ठोस नियोजन नसल्याने या ढिगाऱ्यावरील माती रस्त्यावर येत आहे. पावसात घसरून तर पाऊस नसताना प्रचंड धुळीचे साम्राज्य या ठिकाणी बघायला मिळत आहे.

नुकत्याच झालेल्या पावसात तर भर रस्त्यात चिखल होऊन अनेकांना जीव मुठीत घेऊन या मार्गावरून प्रवास करावा लागला. या मार्गावरून नेहमीच प्रवाश्याना तारेवरची कसरत करावी लागत असुन वेळीच योग्य त्या उपाययोजना करणे आवश्यक आहे अन्यथा अनेकांना प्राणाला मुकावे लागणार असल्याची भिती प्रवाशी व्यक्त करीत आहेत.

# रान डुकराच्या हल्ल्यात युवा पत्रकार गंभीर जखमी

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**मूल, दि. ९ जून :** मूल येथील तरुण पत्रकार आणि सामाजिक कार्यकर्ते अमित राऊत हे रान डुक्कराच्या हल्ल्यात गंभीर जखमी झाले. ही घटना रविवारी रात्री (८ जून) रात्री ९ वाजता चिमढा गावाजवळ घडली. अमित त्यांचे वैयक्तिक काम पूर्ण करून मूलला परत येत असताना त्याचे दुचाकीसमोर अचानक रान डुक्कर आल्याने, त्याचे धडकेत अमीत राऊत दुचाकीवरून खाली पडले. त्यात त्यांचे डोक्याला गंभीर जखम झाल्यांचे प्रत्यक्षदर्शीने सांगीतले.



प्रथमोपचारासाठी त्यांना मूल येथील उपजिल्हा ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. नंतर त्यांची स्थिती गंभीर असल्याने त्यांना चंद्रपूर येथील डॉ. मेहरा हॉस्पिटलमध्ये हलविण्यात आले.

डॉ. मेहरा यांचेकडे उपचार सुरू आहेत, परंतु अद्याप त्यांची प्रकृती धोक्याबाहेर आलेली नाही.

या घटनेबाबत स्थानिक नागरिक, सामाजिक कार्यकर्ते आणि पत्रकार मित्रांनी अमित राऊत यांच्या सुरक्षित व त्वरित बरे होण्यासाठी प्रार्थना करीत आहे.

ग्रामीण भागात वन्य प्राण्यांचे हल्ले वाढत असल्याने या बाबतीत प्रशासनाने योग्य ते निराकरण केले पाहिजे, अशी मागणीही करण्यात आली आहे.

# वैदू हा वनौषधीच्या माध्यमातून जनतेची सेवा करणारा आरोग्य दूत

## पालकमंत्री डॉ. अशोक उईके, प्रियदर्शनी इंदिरा गांधी सभागृहात एक दिवसीय वैदू संमेलन



**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ९ जून :** पारंपरिक उपचार पध्दती ही भारताची देण असून जंगलातील वनौषधीच्या माध्यमातून जनतेची सेवा करणारा गावातला आरोग्य दूत म्हणून वैदूने (ग्राम वैद्य) स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण केली आहे, असे प्रतिपादन राज्याचे आदिवासी विकास मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. अशोक उईके यांनी केले.

वन विभागाच्या वतीने प्रियदर्शनी इंदिरा गांधी सभागृहात आयोजित वैदू संमेलनात ते बोलत होते. यावेळी खासदार डॉ. नामदेव किरसान, आमदार सर्वश्री किशोर जोरगेवार, करण देवतळे, जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी., मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंग, ताडोबा- अंधारी व्याघ्र प्रकल्पाचे संचालक प्रभुनाथ शुक्ला, उपसंचालक आनंद रेड्डी, कुशाग्र पाठक, सुभाष कासनगुट्टूवार, नामदेव डहाळै, एस. एच. पाटील आदी उपस्थित होते.

जिल्ह्यातील वैदूंसोबत संवाद आणि संपर्क व्हावा, हा या कार्यक्रमाचा उद्देश आहे, असे सांगून पालकमंत्री डॉ. उईके म्हणाले, ग्रामीण भागात आजही वैदूंवर विश्वास आहे. तो समर्पणातून सेवा करतो. वैदूंजवळ असलेल्या ज्ञानाचा फायदा वनऔषधींच्या माध्यमातून जनतेला व्हायला पाहिजे. त्यामुळे आपल्याजवळ असलेले ज्ञान लिखित स्वरूपात ठेवावे. तुमचा अनुभव, तुमचे ज्ञान, तुमच्या कुटुंबांना अवगत करा. वनऔषधीतून उपचार करण्याची पद्धती इतरांनाही सांगा. त्यामुळे भविष्यात वनऔषधी पासून अनेक रुग्ण बरे होऊ शकतात. असे केले तरच पारंपारिक ज्ञान जिवंत राहील.

ज्ञानाचे रूपांतर लिखित स्वरूपात असेल तर तुमच्या नंतर त्याचा फायदा नागरिकांना होईल. जे वैदू किंवा ग्रामवैद्य जंगलातून वनउपज जमा करतो त्यांना मानधन मिळवून देण्यासाठी प्रयत्न करू. वैदूंची उपचार पद्धती आजही महत्त्वाची आहे. त्यांच्या अडीअडचणी सोडविण्यासाठी पालकमंत्री म्हणून नक्कीच प्रयत्न करू. हे केवळ एक दिवसाचे संमेलन नव्हे तर येणा?्या काळात वैदूंना न्याय देण्यासाठी अशा प्रकारच्या संमेलनाचे आयोजन करण्यात येईल. तसेच वनऔषधी गोळा करण्यासाठी वनविभागाने त्यांना ओळखपत्र द्यावे, अशा सूचना पालकमंत्री डॉ. अशोक उईके यांनी दिल्या.

आमदार करण देवतळे म्हणाले, चंद्रपूर भागात मोठ्या प्रमाणात जंगल आणि वनस्पती आहे. आयुर्वेदासाठी उपयुक्त वनस्पती आपल्या जिल्ह्यात आढळते. या कार्यक्रमाच्या माध्यमातून आयुर्वेदाबद्दल चांगले मार्गदर्शन होईल, सर्वांनी या कार्यक्रमाचा लाभ घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी खासदार डॉ. नामदेव किरसान यांच्यासह डॉ. सूर्यप्रकाश गभणे, डॉ. एस. एच. पाटील यांनी सुद्धा मार्गदर्शन केले. तत्पुर्वी महाराष्ट्रातील वनऔषधी वनस्पती या पुस्तिकेचे मान्यवरांच्या हस्ते विमोचन करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्पाचे संचालक प्रभुनाथ शुक्ला यांनी केले.

**आयुर्वेद उपचार मानवी जीवनास मिळालेले वरदार : आमदार किशोर जोरगेवार**

वनविभागाने आयुर्वेदिक व पारंपारिक उपचार पद्धतीला चालना देण्याचे काम सुरू केले आहे. आयुर्वेद उपचारपद्धती ही मानवी जीवनाला मिळालेले वरदान असून आयुर्वेदामुळे रोगाचे समूळ उच्चाटन होते, असे आमदार किशोर जोरगेवार यांनी सांगितले. पुढे ते म्हणाले, जंगलातून वनस्पती औषधी लुप्त होत आहे. त्यामुळे मुख्यमंत्र्यांनी जाहीर केलेल्या १० कोटी वृक्षारोपण मोहिमेत औषधी वनस्पतींची लागवड करावी. तसेच ज्या ठिकाणी आयुर्वेदांनुसार उपचार केले जातात, अशा प्रसिध्द गावांची यादी सुद्धा प्रसिद्ध करावी. वैदूंना उदरनिर्वानासाठी काही रक्कम देण्यात यावी किंवा मानधन सुरू करावे, अशी मागणी त्यांनी केली.

# घुग्घूस शहरात बकरीद उत्साहात साजरी



**महासागर प्रतिनिधी**

**घुग्घूस, दि. ९ जून :** शहरातील मुस्लिम कब्रस्थान परिसरातील ईदगाह येथे मुस्लिम समाज बांधवानी सकाळी आठ वाजता बकरी ईद (ईद - उल - अजहा), (ईद - उल - जुहा ) विशेष नमाज अदा करीत गळा भेट घेत एकमेकांना ईदच्या शुभेच्छा दिल्या व कब्रस्थानातील आपल्या मृत पूर्वजाच्या कबरीवर फुलांची चादर चढवीत आशीर्वाद घेतला. बकरी ईद हे मुस्लिम बांधवांचे महत्वाचे धार्मिक आणि सामाजिक सण आहे या सणाचा मुख्य उद्देश म्हणजेच पैगंबर हजरत इब्राहिम (अ. स.)यांच्या बलिदानाला स्मरण करणे आणि अल्लाहच्या इच्छेला पूर्णपणे समर्पण करणे आहे. बकरी ईद मध्ये बकऱ्याची किंवा शासनाने परवानगी दिलेल्या पशुची कुर्बानी देऊन मुस्लिम बांधव आपल्या प्रिय गोष्टीला अल्लाहसाठी अर्पण करतो हे त्याग आणि समर्पण व भावनांचा प्रतीक आहे. ईद निमित्त पोलीस प्रशासनाने ईदगाह परिसरात पेंडाल टाकून पोलीस उपनिरीक्षक तायवाडे, व पोलीस कर्मचाऱ्यांनी समाज बांधवाना गुलाबाचे फुल देऊन त्यांना शुभेच्छा दिल्या व शहरात चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आले.

# माजी आमदार निमकर यांच्या हस्ते २० लक्ष रु. विकास कामांचे भूमिपूजन संपन्न



**महासागर तालुका प्रतिनिधी**

**राजुरा, दि. ९ जून :** ग्रामपंचायत चुनाळा (ता.राजुरा) येथे शासनाच्या जनसुविधा योजना निधी व अनुसूचित जाती नवबौद्ध घटक वस्ती विकास योजना अंतर्गत मंजूर झालेल्या वार्ड क्र. २ मधील दत्त दत्त मंदिर ते श्रीनिवास गादगोणीवार यांच्या घरापर्यंत १० लक्ष . कॉंक्रिट रोड बांधकाम,वार्ड क्र. ४ मधील ग्रा.पं. जवळील मुख्य रस्त्यापासून ते रमेश बुरगु यांचे घरापर्यंत १० लक्ष, कॉंक्रिट रोड बांधकाम, अश्या २० लक्ष कॉंक्रिट रोड च्या कामांचे भूमिपूजन तथा शुभारंभ माजी आमदार सुदर्शन निमकर यांच्या हस्ते व ग्रामपंचायत चे सरपंच बाळनाथ वडस्कर यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आले.

या दोन्ही रस्ते रहदारीसाठी अत्यंत महत्त्वाचे होते. सदर रस्त्यांची कामे मंजूर करावी अशी वार्ड वासीयांची गेल्या अनेक दिवसांपासून मागणी होती. महत्त्वाचे असलेले रस्ते मंजूर करावे अशी मागणी सरपंच बाळनाथ वडस्कर यांनी माजी आमदार निमकर यांच्याकडे केली होती.

या रस्त्यांचे महत्व लक्षात घेऊन माजी आमदार निमकर यांनी पाठपुरावा करून कामांना मंजुरी प्राप्त करूनघेतली.

या भूमिपूजन कार्यक्रमाला कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती संजय पावडे, ग्रा. पं. सदस्य राकेश कार्लेकर, संतोषी निमकर, वंदना पिदुरकर, उषा करमनकर, कोमल काटम, शिवराम पा. हेपट, बाबुराव पा. मासिरकर, बंडू निमकर, पोलीस पाटील रमेश निमकर, मनोहर निमकर, माणिकराव पिंगे, रविंद्र वांढरे, पांडुरंग पा. वडस्कर, मुरलीधर निमकर, बबन मोरे, विलास माणूसमारे, सुनील मुरकुटलावार, मनोहर पारखी, विजय कार्लेकर, रवी गोरपाटी, बजरंग धुर्वे सह मान्यवर तथा गावकरी उपस्थित होते.

महत्त्वाच्या अशा या दोन्ही रस्त्यांची कामे प्रत्यक्षात सुरू झाल्याबद्दल वार्ड वासीयांनी माजी आमदार निमकर व सरपंच वडस्कर तथा ग्रामपंचायत च्या सदस्यांचे आभार व्यक्त केले.

# दागीणे चोरणारी टोळी जेरबंद

**चंद्रपूर :** बस स्थानक परिसरातुन प्रवाश्यांचे सोन्याचे दागीने चोरी करणारी महिलांची टोळी पकडण्यात मुल पोलीस स्टेशनला यश आले असून आरोपींकडून सोन्याचे दागीने एकुण २,५०,००० रुपयाची मालमत्ता ची जप्त करण्यात आली आहे. तक्रार देणारी महिला दिनांक ६ मे २०२५ रोजी सकाळी १०:४५ वा. दरम्यान मुल बस स्थानक येथे येथुन प्रवाश्यांचे गर्दीत बस मध्ये चढुन बसच्या आत गेली असता तिचे गळयातील चेन चोरली.

# भद्रावती नगरपालिकेद्वारे दुषित पाण्याचा पुरवठा

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**भद्रावती, दि. ९ जून :** नगरपालिका द्वारे भद्रावतीकरांना गेल्या दोन दिवसापासून दुषित पाणीपुरवठा केल्या जात आहे. याकडे नगरपालिका प्रशासनाने त्वरित लक्ष वेधून शुद्ध पाणीपुरवठा करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

नगरपरिषदेचे मोठे जलशुद्धीकरण केंद्र आहे, त्यातूनच संपूर्ण भद्रावतीकरांना नळाद्वारे शुद्ध पाणीपुरवठा केला जातो , मात्र दिनांक आठ व नऊ जूनला सकाळी व सायंकाळला येणा?्या नळ धारकांकडे पिवळसर रंग व अनडोली सदृश्य जंत असलेली पाणी नळाद्वारे आले आहे, त्यामुळे हे पाणी पिऊन नागरिकांचे आरोग्य धोक्यात येण्याची शक्यता नाकारता येत नाही. न. प. प्रशासनाकडे जल शुद्धीकरण केंद्र असून नागरिकांना दूषित पाणी पुरवठा का केल्या जात आहे हा प्रश्न भद्रावतीकरांना पडला आहे. करिता शुद्ध पाणीपुरवठा करण्याची मागणी नागरिकांनी केली आहे.

# सर्वांना विश्वासात घेऊन निधीचे वाटप करणार

## पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन समितीची बैठक



**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ९ जून :** जिल्हा नियोजन समितीचा निधी हा विकासाच्या कामासाठी उपयोगात आणला जातो. या निधीचे वितरण करताना जिल्ह्यातील सर्व लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊनच वाटप करण्यात येईल. तसेच जिल्ह्याशी संबंधित सर्व महत्त्वाच्या मुद्यांवर सर्व लोकप्रतिनिधींना घेऊन मुख्यमंत्र्यांसोबत बैठक घेण्यात येईल, जेणेकरून जिल्ह्यातील सर्व प्रश्न तातडीने मार्गी लागावे, असे राज्याचे आदिवासी विकास मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. अशोक उईके यांनी सांगितले.

नियोजन भवन येथे जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीत ते बोलत होते.

बैठकीला खासदार सर्वश्री प्रतिभा धानोरकर, डॉ. नामदेव किरसान, आमदार तथा विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार, आमदार सुधाकर अडवाले, अभिजीत वंजारी, किशोर जोरगेवार, कीर्तीकुमार भांगडीया, करण देवतळे, देवराव भोंगळे, जिल्हाधिकारी विनय गौडा, मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंग, पोलिस अधीक्षक मुम्मका सुदर्शन, जिल्हा नियोजनअधिकारी संजय कडू तसेच इतर विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

सन २०२४ - २५ मध्ये सर्वसाधारण योजनेचे ४५६ कोटी, आदिवासी उपयोजनेचे १०३ कोटी, अनुसूचित जाती उपयोजनेचे ७५ कोटी असे एकूण ६३४ कोटी ४२ लक्ष निधी विकास कामांवर खर्च करण्यात आला आहे, असे सांगून पालकमंत्री डॉ. अशोक उईके म्हणाले, आरोग्य हा अतिशय महत्त्वाचा विषय असून जिल्ह्यातील सर्व प्राथमिक केंद्र व उपकेंद्रासाठी निधी दिला जाईल. तसेच अद्यावत सोयी सुविधा या केंद्रामधून देण्यात येईल. त्यासाठी विशेष प्रस्ताव पाठवावा. जिल्ह्यातील अंगणवाड्यांचे बांधकाम आवर्जून पूर्ण करावे. नगरपालिका व नगरपंचायत क्षेत्रातील अंगणवाड्यांना सुद्धा निधी देण्यात येईल.

ग्रामीण भागातील नागरिक योजनांपासून वंचित राहू नये, त्यासाठी जिल्ह्याचा एक चांगला प्रस्ताव तयार करावा. सर्व तालुका स्तरावर क्रीडा विकासासाठी आणि व्यायामशाळांसाठी वाढीव निधीचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला आहे. कर्मवीर मा.सां. कन्नमवार शासकीय वैद्यकीय महाविद्यालयासह ग्रामीण भागात औषधींसाठी निधीची कमतरता पडू देणार नाही. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातून मृतदेह मोफत घरी नेण्यासाठी शववाहिकांची संख्या वाढवावी. जिल्ह्यातील 'ब' आणि 'क' दर्जाच्या तीर्थक्षेत्रांना सुध्दा निधी देण्यात येईल. सर्व लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊनच या निधीचे वाटप करण्यात येईल, अशी ग्वाही पालकमंत्री डॉ. अशोक उईके यांनी दिली. तसेच आजच्या बैठकीला जे अधिकारी गैरहजर असतील, त्यांना कारणे दाखवा नोटीस देण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या. यावेळी खासदार आणि आमदारांनीसुद्धा आपापल्या सूचना मांडल्या.

राजशिष्टाचारानुसारच विकासकामांचे लोकार्पण व्हावे : शासनाच्या निधीतून विकासकामांचे लोकार्पण होत असतांना ते राजशिष्टाचारानुसारच व्हावे. लोकप्रतिनिधींची नावे कोनशिलेवर टाकावी. असे निर्देश पालकमंत्री डॉ अशोक उईके यांनी दिले.

पालकमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत कृषी, आरोग्य, वने, पर्यटन, शिक्षण, अवकाळी पावसाने नुकसान झालेले पंचनामे, कृषी पंप जोडणी, जिल्हा परिषद, पोलीस विभाग व इतर सर्व विषयांचा विस्तृत आढावा घेण्यात आला. तसेच १ फेब्रुवारी २०२५ रोजी संपन्न झालेल्या जिल्हा नियोजन समितीच्या बैठकीचे इतिवृत्त कायम करणे व इतिवृत्तावरील अनुपालनास मान्यता प्रदान करणे, जिल्हा वार्षिक योजना सन २०२४ -२५ अंतर्गत खर्चास मान्यता देणे, सन २०२५ -२६ अंतर्गत खर्चाचा आढावा यावेळी घेण्यात आला.

# विजेच्या धक्क्याने तरुणाचा मृत्यू

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**चिमूर, दि. ९ जून :** चिमूर शहरातील एका तरुण युवकाचा अचानक आलेल्या पाऊस व कडाक्याच्या विजेच्या धक्क्याने मृत्यू झाल्याची घटना सायंकाळी ४ ते ५ च्या सुमारास घडली.



प्राप्त माहितीनुसार युवक मित्रांसोबत चिमूर पासून जवळच असलेल्या बोरगाव येथील हनुमान मंदीरात देव दर्शनासाठी गेले असता अचानक वातावरण बदलले व पाऊस सुरू झाला आणि आकाशात जोरदार विज चमकली त्यामुळे विजेच्या धक्क्याने तरुण युवक प्रथमेश अतुल वानखेडे वय २० वर्ष राहणार चिमूर याचा जागीच मृत्यू झाला. तरुणाच्या आकस्मीक मृत्यूने हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

# जिल्हा सहकारी बँक निवडणूकीसाठी राजुरा (गट-अ) मधून शेतकरी संघटनेचे शेषराव बोंडे यांचे नामांकन



**महासागर तालुका प्रतिनिधी**

**राजुरा, दि. ९ जून :** चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक निवडणूकीत राजुरा (गट-अ) मधून शेतकरी संघटनेचे शेषराव बोंडे यांचे नामांकन अर्ज दाखल करण्यात आले.

एकूण १८ सदस्य संख्या असून शेतकरी संघटना कडे जवळपास ८ सदस्य असून विजय करिता फक्त एका उमेदवाराची आवश्यकता आहे.

भाजप कडे ३ तर कॉंग्रेस कडे ७ सदस्य संख्या असून भाजपचे सदस्य ज्याठिकाणी मतदान करेल तो उमेदवार विजय होणार यात काही शंका नाही. काल माजी आमदार वामनराव चटप यांच्या मार्गदर्शनात शेतकरी संघटनेचे शेषराव बोंडे यांचे नामांकन अर्ज दाखल करण्यात आले.

यावेळी ॲड. दीपक चटप, रमेश नळे, दिलीप देरकर, विनायक महाकुलकर, रमेश बोबडे, मधू चिंचोलकर, आशुतोष चटप, अमोल निमकर, समाधान लडके, रमेश बोंडे, नरेश पोटे आदींची उपस्थिती होती.

## सिडीसीसी बँक नोकरभरतीची तक्रार

**चंद्रपूर, दि. ९ जून :** तब्बल १३ वर्षांनंतर होणाऱ्या चंद्रपूर जिल्हा मध्यवर्ती बँकेच्या निवडणुकीबाबत आमदार किशोर जोरगेवार यांनी मुंबईतील मंत्रालयात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन महत्त्वपूर्ण चर्चा केली. याआधीही त्यांनी वेळोवेळी मुख्यमंत्री यांचे निवडणूक प्रक्रियेतील अनियमितता व गैरप्रकारांकडे लक्ष वेधले होते.२०१२ नंतर आता २०२५ मध्ये होत असलेल्या बँकेच्या निवडणुकीबाबत न्यायालयाने निवडणूक प्रक्रियेदरम्यान कोणतेही धोरणात्मक निर्णय न घेण्याचे निर्देश देण्यात आले होते. मात्र, बँकेच्या सध्याच्या व्यवस्थापनाने हे आदेश धाब्यावर बसवत काही निर्णय घेतले आहेत, असा आरोप होत आहे.

## चेक अनादर प्रकरणी शिक्षा

**नागभीड, दि. ९ जून :** चिमूर तालुक्यातील वाहनगाव येथील फिर्यादी सुधाकर आत्माराम थुटे यांनी आपला शेतीतील कापूस गौतम तुकसेन पाटील गुजगव्हाण यांना २०२० मध्ये विकला त्यांनी काही रक्कम ३४६०० दिली तर उरलेली रक्कम तीन लाख तेवीस हजार चारशे रुपये हे स्टेट बँक सावरी व महाराष्ट्र बँक तुकूम नावाने धनादेशाचे स्वरूपाने दिली. सुधाकर थुटे यांनी दोन्ही धनादेश को ऑफ बँक खडसंगी येथे पाठविण्यात आले असता खात्यात रक्कम नसल्याने अनादरण झाले असल्याचे बँकेकडून लेखी मेमो देण्यात आले. आपली रक्कम मिळावी म्हणून फिर्यादीने १४ ऑगस्ट २०२०रोजी गुन्हा नोंद करून २७ ऑगस्ट रोजी २०२०रोजी फिर्याद दाखल करून न्यायालयीन प्रक्रिया सुरू केली. फिर्यादी व आरोपी यांनी तपासणी, उलट तपासणी करून १७ मे २०२५रोजी आरोपीस रक्कम अनादर प्रकरणी सहा महिन्याची सक्त मजुरीची शिक्षा सुनावण्यात आली.

# श्री गजानन माऊलींचे जीवनात येण भाग्याच लक्षण - प्रा सुरेश शेवडे

## श्री संत गजानन गाथा अमृतकण कार्यक्रमात प्रतिपादन

**महासागर प्रतिनिधी**

**वरोरा, दि. ९ जून :** श्री संत गजानन महाराजांचे जीवन अलौकिक आहे. जीवन कसं जगावं हे महाराजांनी शिकवलं. त्यांनी तहानलेल्या पाणी दिलं आणि प्रसंगी मधमाशांचे डंख सोसले. ज्यांनी महाराजांची भक्ती मनोभावे केली त्या अनेकांच्या जीवनात महाराज आले आणि त्यांच्या कृपाप्रसादाने जीवन समृद्ध करून गेले. म्हणून महाराजांचे जीवनात येणं हे भाग्याचं लक्षण असल्याचे प्रतिपादन गजानन महाराज बावन्नीचे रचियेते प्रा. सुरेश शेवडे उपाख्य आबा यांनी केले.

श्री संत गजानन महाराज भक्त परिवाराच्या वतीने आयोजित अमृतकण या प्रवचनपर प्रसंगी ते बोलत होते





९० वर्षीय प्रा. शेवडे यांची रसाळ वाणी आणि खणखणीत आवाजाने भक्तगणांच्या मनाचा ढाव घेतला. महाराजांचे संपूर्ण चरित्र गजानन बावन्नी मध्ये मांडताना आलेले अनेक अनुभव आणि महाराजांचे चरित्र त्यांनी याप्रसंगी उलगडून दाखविले. मनुष्यामध्ये सत्व, रज आणि तम हे तीन गुण असतात. त्यापैकी महाराजांनी सत्वगुणांचे सिंचन केले. म्हणून महाराज गुणातीत आहेत. महाराजांना सदाचार आवडतो. म्हणूनच सदाचारी आणि मनापासून श्रद्धा असणाऱ्या भक्तांना महाराज आपल्याजवळ असल्याची अनुभूती येते ते म्हणाले.

हिंदू धर्म जगात श्रेष्ठ आहे हे सांगताना प्रा. शेवडे यांनी अमेरिकेमधील हिंदू परिषदेतील अनुभव कथन केले. हिंदू हा धर्म आहे, कारण तो ईश्वराने निर्माण केला. इतर मात्र पंथ आहेत. हे पंथ माणसाने निर्माण केले. म्हणूनच आमचे वेद व पुराण हे ईश्वराची निर्मिती असल्याने जगात पूज्य मानले जातात असेही ते म्हणाले.

कार्यक्रमाच्या पूर्वी वरोरा नगरातून पादुका परिक्रमा करण्यात आली. यावेळी ठिकठिकाणी रांगोळी आणि पुष्पवृष्टीने पादुकांचे स्वागत करण्यात आले.

बाळकृष्ण कुळसंगे उल्हासनगर यांनी आपले अनुभव कथन याप्रसंगी केले. त्यांच्या अनुसंधानातील अमृतकण या ग्रंथाचे विमोचन याप्रसंगी करण्यात आले.

संचालन उमेश लाभे तर प्रास्ताविक राजीव दोडके यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीते करिता राबणाऱ्या भक्तगणांचा सत्कार याप्रसंगी करण्यात आला.

मुंबई, यवतमाळ, चंद्रपूर यासह अनेक ठिकाणावरून मोठ्या प्रमाणात भक्तगण कार्यक्रमाला उपस्थित होते.

# वनविभागा द्वारे हत्तीपासून संरक्षणात्मक उपाययोजनेसाठी कार्यशाळेचे आयोजन

**महासागर तालुका प्रतिनिधी**

**सावली, दि. ९ जून :** सावली वनपरिक्षेत्रात मागील वर्षभरापासून जंगली हत्तींचा धुमाकूळ होता. यात अनेक शेतकऱ्यांचे धान व मका पिकाचे नुकसान झाल्याने वनपरिक्षेत्र स्तरावर तात्काळ समिती गठीत करून मोका पंचनामा करून नुकसान भरपाई देण्याची कारवाई करण्यात आली.

हत्तींपासून मनुष्यहानी होऊ नये म्हणून वनविभागावर द्वारे बॅनर लावणे दवंडी देणे लाऊड स्पीकरवर सूचना देणे ग्रामपंचायती द्वारे सूचना देणे पोलीस विभाग तसेच गावातील सरपंच व पोलीस पाटील यांचे मदतीने वारंवार सूचना देऊन जनजागृती केली गेली तसेच हत्तीचे अस्तित्व असलेल्या काळात २४ तास वनविभागाचे पथक पाळतीवर ठेवून संरक्षणाची कामे केली गेली.

मागील तीन वर्षापासून ओरिसा व छत्तीसगड राज्यातून गडचिरोली जिल्ह्यात आलेल्या रानटी हत्तींचे अधून मधून सावली वनपरिक्षेत्रात प्रवेश होत असतो.

नुकत्याच चार दिवसापूर्वी सावली वनपरक्षत्रात दोन टचकर हत्तींचे आगमन झालेले होते. रानटी हत्तींपासून मनुष्यहानी होऊ नये



म्हणून हत्तींपासून संरक्षण कसे करावे याचे कोणकोणती खबरदारी घ्यावी व काय काय उपाययोजना कराव्यात याबाबत सावली वनपरिक्षेत्रातील मौजा राजोली येथे चार जून रोजी कार्यशाळा पार पडली.

सदर कार्यशाळेत प्रमुख मार्गदर्शक म्हणून रिचाकुमार जीवशास्त्रज्ञ तथा हत्ती व्यवस्थापन तज्ञ रायपुर, डॉक्टर रविकांत खोब्रागडे पशुधन विकास अधिकारी ताडोबा अंधारी व्याघ्र प्रकल्प चंद्रपूर, राकेश अहुजा जीव शास्त्रज्ञ ब्रह्मपुरी वन विभाग, नूर जीवशास्त्रज्ञ मध्य चांदा वन विभाग, नारनवरे जीवशास्त्रज्ञ चंद्रपूर वन विभाग यांनी मार्गदर्शन केले.

विशाल सालकर वनपरिक्षेत्र अधिकारी शिंदेवाही विनोद दुर्वे वनपरिक्षेत्र अधिकारी सावली सुरेंद्र सिंग वाकडोद क्षेत्र सहाय्यक राजोली नंदकिशोर पाटील शेत्र सहाय्यक पाथरी रविश सूर्यवंशी शेत्र सहाय्यक व्याहाड, वनरक्षक श्रीराम आदे अविनाश नाने भुलेश्वर सोनेकर महादेव मुंडे एकनाथ खुडे श्रीमती प्रिया शेंडे श्रीमती प्रिया वाघमारे तसेच शिरसी कडोली रयतवारी सोलापूर व विरखलचक येथील पी आर टी चमू, आर आर टी टीम, या एस टी पी एफ आणि मूल बफर व शिंदेवाही वनपरिक्षेत्रातील कर्मचारी उपस्थित होते. सदरच्या कार्यशाळेचे आयोजन प्रशांत खाडे विभागीय वन अधिकारी चंद्रपूर व श्री विकास तरशे सहायक वन संरक्षक चंद्रपूर यांचे मार्गदर्शनाखाली विनोद धुर्वे वनपरीक्षेत्र अधिकारी सावली यांनी केले.

# वीर बिरसा मुंडा इंग्रजांविरुद्ध लढा देणारे थोर क्रांतिसुर्य : विवेक बोढे

## मा.ना.सुधीरभाऊ मुनगंटीवार सेवा केंद्रात वीर बिरसा मुंडा यांच्या स्मृती दिनानिमित्त अभिवादन

**महासागर प्रतिनिधी**

**घुग्घूस, दि. ९ जून :** येथील मा.ना. सुधीरभाऊ मुनगंटीवार सेवा केंद्रात सोमवार, ९ जुन रोजी सकाळी आदिवासी जननायक, क्रांतिसूर्य, वीर बिरसा मुंडा यांच्या स्मृती दिनानिमित्त अभिवादन करण्यात आले.

याप्रसंगी वीर बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून भाजपाचे जिल्हा महामंत्री विवेक बोढे यांनी अभिवादन केले.

मनोगत व्यक्त करतांना भाजपाचे जिल्हा महामंत्री विवेक बोढे म्हणाले, आदिवासी जननायक, क्रांतिसूर्य, वीर बिरसा मुंडा हे इंग्रजांविरुद्ध लढणारे थोर क्रांतिसुर्य होते.

त्यांनी आदिवासिंच्या हक्कासाठी इंग्रजांविरुद्ध लढा दिला. 'उलगुलान' चे मोठे



आंदोलन सुरु केले. ज्यात आदिवासिंनी इंग्रज सरकारविरोधात बंड केले.

शहीद वीर बिरसा मुंडा यांच्या स्मृतीदिन ९ जुन रोजी साजरा केला जातो. या दिवशी वीर बिरसा मुंडा यांच्या हौतात्म्याची आठवण केली जाते.

यावेळी भाजपा जिल्हा महामंत्री विवेक बोढे, डॉ. सुर्यभान वासेकर, निखिल आत्राम, मंगेश उलमाले, गौरव तुराणकर, निशा उरकुडे, प्रीती धोटे, खुशबू मेश्राम, भारती परते, स्वाती गंगाधरे, प्रिया नागभिडकर, जाई आत्राम, नेहा कुम्मरवार आदींची उपस्थिती होती.

# घुग्घूस काँग्रेस कार्यालयात बिरसा मुंडा यांना आदरांजली



**महासागर प्रतिनिधी**

**घुग्घूस, दि. ९ जून :** अबुआ दिशूम अबुवा राज ( हमारा देश हमारा राज) चा नारा देणारे भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील क्रांतिकारक आणि आदिवासी समाजाच्या हक्कासाठी लढणारे धरती पकड भगवान बिरसा मुंडा यांना आदिवासी समाजात देवाचं स्थान प्राप्त आहे.

त्यांनी झारखंड, बिहार, छत्तीसगड, मध्य प्रदेश, पश्चिम बंगालच्या आदिवासी समाज बांधवासाठी आपल्या प्राणाची बली दिली.

वयाच्या चौविसाव्या वर्षी शहीद होणारे बिरसा मुंडा यांची आज पुण्यतिथी यानिमित्त काँग्रेस जनसंपर्क कार्यालयात काँग्रेस अध्यक्ष राजुरेड्डी व पदाधिकाऱ्यांनी बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेला माल्यार्पण करून विनम्र आदरांजली अर्पित करण्यात आली.

याप्रसंगी काँग्रेस नेते सैय्यद अनवर, सोशल मीडिया जिल्हाध्यक्ष रोशन दंतलवार, तालुका सचिव विशाल मादर, दिपक पेंदोर, सुनील पाटील, दिपक कांबळे, मनोज चांदेकर, शहंशाह शेख,निखिल पुनघंटी, आयुष आवळे, अंकुश सपाटे व अन्य पदाधिकारी उपस्थित होते.

# पालकमंत्र्यांकडून बिरसा मुंडा यांना अभिवादन

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ९ जून :** शहीद दिनानिमित्त भगवान बिरसा मुंडा यांना राज्याचे आदिवासी विकास मंत्री तथा चंद्रपूर जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. अशोक उईके यांनी अभिवादन केले.

यावेळी आमदार किशोर जोरगेवार, जिल्हाधिकारी विनय गौडा जी.सी. मुख्य कार्यकारी अधिकारी पुलकित सिंग, जिल्हा पोलिस अधिक्षक मुम्मका सुदर्शन, उपसंचालक आनंद रेड्डी, प्रकल्प अधिकारी विकास राचेलवार, सुभाष कासनगट्टूवार आदी उपस्थित होते.

पालकमंत्री डॉ. उईके यांनी शहीद बिरसा मुंडा यांच्या पुतळ्याला माल्यार्पण करून



अभिवादन केले. यावेळी ते म्हणाले, भगवान बिरसा मुंडा हे ९ जून रोजी शहीद झाले.

त्यानिमित्त आज सर्व आदिवासी बांधव, विविध सामाजिक संघटना तसेच शासकीय स्तरावर शहीद दिनानिमित्त त्यांना अभिवादन करण्यात आले आहे. १५ नोव्हेंबर ही बिरसा मुंडा यांची जयंती देशात जनजाती गौरव दिन म्हणून साजरी केली जाते.

संपूर्ण आदिवासी समाजाचा हा गौरव आहे. बिरसा मुंडा यांनी केलेल्या कार्यानुसार आदिवासी समाजाने वाटचाल करावी, असेही त्यांनी सांगितले.

# खा. धानोरकर यांनी केल्या महिलांसाठी 'हिरकणी कक्ष', मोफत शववाहिका सेवा आदि मागण्या

## शेतकऱ्यांची गोठविलेली बँक खाती तात्काळ सुरु करा

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ९ जून :** जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाला गती देण्यासाठी आणि नागरिकांच्या गरजा पूर्ण करण्याच्या उद्देशाने, आगामी जिल्हा वार्षिक योजना २०२५-२६ च्या बैठकीच्या पार्श्वभूमीवर, खासदार प्रतिभाताई धानोरकर यांनी आज अनेक महत्त्वपूर्ण आणि लोकहितकारी मागण्या व सूचना जिल्हा प्रशासनाकडे केल्या आहेत. यामध्ये पोलीस ठाण्यात महिलांसाठी 'हिरकणी कक्ष', मोफत शववाहिका सेवा, पोलीस दलाचे आधुनिकीकरण आणि आरोग्य सेवांचा विस्तार यावर विशेष भर देण्यात आला आहे.

आज पालकमंत्री अशोक उईके यांचा अध्यक्षतेखाली जिल्हा नियोजन समितीची बैठक पार पडली. यावेळी खासदार नामदेव किरसान, विधान सभेचे गटनेते आमदार विजय वडेट्टीवार, आमदार सुधाकर अडबाले, आमदार अभिजित वंजारी, आमदार कीर्तिकुमार भांगडिया, आमदार किशोर जोरगेवार, आमदार देवराव भोंगाडे, आमदार करण देवतळे, जिल्हाधिकारी विजय गौडा, पोलीस अधीक्षक सुदर्शन मुमक्का, मुख्य



कार्यकारी अधिकारी पुलकित सिंग यांची उपस्थिती होती.

खासदार प्रतिभाताई धानोरकर यांच्या प्रमुख मागण्यामध्ये गेल्या काही काळापासून शेतक?्यांमध्ये कर्जमाफीची अपेक्षा होती. याच अपेक्षेने अनेक शेतक?्यांनी आपली जुनी कर्जे भरली नाहीत. परंतु, शासनाने या खात्यांवर निर्बंध घालत ती गोठवली, ज्यामुळे शेतक?्यांची मोठी कोंडी झाली आहे. याचा थेट परिणाम त्यांच्या नवीन कर्ज घेण्याच्या क्षमतेवर झाला आहे. सध्या खरीप हंगामाच्या तोंडावर शेतक?्यांना बियाणे, खते, कीटकनाशके आणि इतर शेतीमालासाठी तातडीने पैशांची गरज असताना, गोठवलेल्या खात्यांमुळे त्यांना कॉप लोन किंवा इतर कोणत्याही प्रकारची नवीन कर्जे मिळत नाहीत. त्यामुळे तात्काळ गोठवलेले खाती पुन्हा पूर्ववत सुरु करण्याची मागणी यावेळी खासदार प्रतिभाताई धानोरकर यांनी केली आहे. तसेच महिलांच्या सुरक्षेला सवोच्च प्राधान्य देत, जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांमध्ये 'हिरकणी कक्ष' उभारण्यासाठी जिल्हा वार्षिक योजनेतून निधी उपलब्ध करून देण्याची मागणी त्यांनी केली आहे. विशेषतः, लहान मुलांच्या मातांना पोलीस ठाण्यांमध्ये तक्रार देण्यासाठी यावे लागते तेव्हा त्यांच्यासोबत असलेल्या लहान मुलांच्या गरजा, विशेषतः स्तनपानाची सोय उपलब्ध नसणे ही एक मोठी समस्या असते. या कक्षांमध्ये स्तनपानासाठी सुरक्षित आणि खाजगी जागा उपलब्ध झाल्यास, लहान मुलांच्या मातांना मोठा दिलासा मिळेल आणि त्या अधिक निवांतपणे व सुरक्षित वातावरणात आपली तक्रार नोंदवू शकतील. यामुळे महिलांना त्वरित मदत आणि सुरक्षित वातावरण मिळेल. तसेच पोलीस दलाची कार्यक्षमता वाढवण्यासाठी जिल्ह्यातील सर्व पोलीस ठाण्यांचे आधुनिकीकरण करण्यास आणि पोलीस अधिकारी व कर्मचा?्यांसाठी पोलीस ठाण्यांच्या शेजारीच निवासस्थानांची व्यवस्था करण्यास निधी उपलब्ध करून देण्याची मागणी खासदार महोदयांनी केली आहे. तसेच बालकांच्या सर्वांगीण विकासासाठी आणि त्यांना चांगल्या वातावरणात शिक्षण मिळावे यासाठी जिल्ह्यातील अंगणवाड्या सुसज्ज आणि सुबक बनवण्यासाठी निधीची तरतूद करण्याची सूचना त्यांनी केली आहे. तसेच उपचारादरम्यान शासकीय रुग्णालयांमध्ये, विशेषतः चंद्रपूर वैद्यकीय महाविद्यालयात, मृत पावलेल्या रुग्णांना त्यांच्या घरापर्यंत पोहोचवण्यासाठी जिल्ह्याच्या वार्षिक योजनेतून मोफत शववाहिका खरेदी करून उपलब्ध करून देण्याची मागणी खासदार प्रतिभाताई धानोरकर यांनी केली आहे. अनेकदा अशा परिस्थितीत कुटुंबीयांना मृतदेहाची घरी ने-आण करण्यासाठी आर्थिक अडचणींचा सामना करावा लागतो. ही एक अत्यंत संवेदनशील आणि सामाजिक जबाबदारीची बाब असून, यामुळे गरीब आणि गरजू कुटुंबांना मोठा दिलासा मिळेल आणि त्यांना आर्थिक भार सोसावा लागणार नाही.

खासदार प्रतिभाताई धानोरकर यांनी जिल्हा प्रशासनाला आवाहन केले आहे की, जिल्हा वार्षिक योजना २०२५-२६ मध्ये या सर्व लोकहितकारी मागण्यांचा गांभीर्याने विचार करून त्यांची तातडीने अंमलबजावणी करावी. चंद्रपूर जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासासाठी आणि नागरिकांच्या जीवनात सकारात्मक बदल घडवण्यासाठी हे उपक्रम अत्यंत महत्त्वाचे ठरतील, असे त्यांनी नमूद केले.

# मराठा सेवा संघाने केला गुणवंत विद्यार्थ्याचा सत्कार

**महासागर प्रतिनिधी**

**चंद्रपूर, दि. ९ जून :** मराठा सेवा संघ चंद्रपूरच्या वतीने ८ जुन रोजी राजर्षी शाहू महाराज जयंती तसेच दहावी, बारावी व स्पर्धा परीक्षेत यशस्वी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्काराचा कार्यक्रम जिजाऊ भवन मराठा सेवा संघाचे कार्यालय आक्केवार वाडी तुकूम चंद्रपूर येथे संपन्न झाला.

त्यावेळी कार्यक्रमाचे अध्यक्ष मराठा सेवा संघ चंद्रपूरचे जिल्हाध्यक्ष इंजि. दिपक खामनकर होते तर कार्यक्रमाचे उदघाटक जनता कनिष्ठ महाविद्यालयाचे सेवानिवृत्त उपप्राचार्य प्रा. बबनराव राजुरकर होते. प्रमुख मार्गदर्शक चंद्रपूर येथील प्रसिद्ध अस्थिरोग तज्ञ डॉ. निखिल टोंगे होते. प्रमुख पाहुणे म्हणून प्रदेश उपाध्यक्ष मराठा सेवा संघ महाराष्ट्र दिपकभाऊ जेऊरकर, चंद्रपूर आकाशवाणीचे अभियांत्रिकी विभागाचे सहाय्यक निदेशक संध्या किळाके, जिजाऊ ब्रिगेड जिल्हाध्यक्ष अर्चना चौधरी, शासकीय विद्युत कंत्राटदार अनुप बोर्डे उपस्थित होते.

कार्यक्रमाचे प्रमुख मार्गदर्शक डॉ. निखिल टोंगे यांनी राजश्री शाहू



महाराज यांचे शैक्षणिक कार्य सांगुन आधुनिक काळातील स्पर्धेत प्रयत्न कसे करावे याबाबत आजचे शैक्षणिक बदल, धोरण आणि त्यांना डॉक्टर बनतांना आलेले अनुभव याची सुंदर सांगड घालत विद्यार्थ्यांना मार्गदर्शक केले.

कार्यक्रमाचे उदघाटक प्रा. बबनराव राजुरकर मनोगत व्यक्त करताना म्हणाले की समाजातील लोक काय म्हणतील याकडे विद्यार्थ्यांनी दुर्लक्ष करून मेहनत चिकाटी सातत्य कायम ठेवत अभ्यास करावा यश नक्कीच मिळते. इतरही उपस्थित प्रमुख पाहुण्यांनी मनोगत व्यक्त करुन विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले व पुढे यशस्वी वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या.

गुणवंत विद्यार्थी गौरव कार्यक्रमात दहावीत ८५ टक्के, बारावी सायन्स ८० टक्के व आर्ट ७५ टक्के च्या वर गुण घेणाऱ्या ५० विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुण्यांनी सन्मानचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित केले.

तसेच जगतगुरु तुकोबाराय सार्वजनिक वाचनालय तुकूम चंद्रपूर येथे अभ्यास करून स्पर्धा परीक्षा दिली व शासकीय सेवेत निवड झाल्याबद्दल शुभम राजूरकर, रोशन गजभे, सोमेश्वर पिंपळकर, प्रीतम गेडाम, आदेश पुन्नावार, पनविल रेगुलवार आणि प्रोॲक्टिव्ह अबॅकस राष्ट्रीय चॅम्पियनशिप कोल्हापूर येथे पार पडलेल्या स्पर्धेत १३ राज्यातून प्रथम पारितोषिक मिळवणारा चैतन्य गणेश धकाते आणि भारतातील नामांकित सैनिक शाळेत स्पर्धा परीक्षेच्या माध्यमातून प्रवेश मिळविल्याबद्दल ईशान विनोद थेरे आदी विद्यार्थ्यांचा विशेष सत्कार प्रा. बबनराव राजूरकर यांच्या कडून त्यांचे वडील स्मृतीशेष वासुदेवराव राजुरकर यांचे स्मृतिप्रित्यर्थ गुणवंत व स्पर्धा परीक्षेत यशस्वी विद्यार्थ्यांना स्मृतीचिन्ह व प्रशस्तीपत्र देऊन सन्मानित करण्यात आले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रशांत गोखरे यांनी केले.

सुत्रसंचालन कुंदन परकारे व चेतन बोबडे यांनी केले तर आभार संकल्प निखाडे यांनी मानले. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मराठा सेवा संघ व सर्व कक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते यांनी परिश्रम घेतले.

RNI No.49746/1988 चंद्रपूर महासागर

मालक, मुद्रक, प्रकाशक सौ. निर्मला चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापुन दैनिक चंद्रपूर महासागर कार्यालय, पोपट बिल्डींग जटपुरा गेट, चंद्रपूर येथे प्रकाशित केले. संपादक राहुल चांडक

मुख्य कार्यालय फोन - ७४४७७३५८५१, ९९२२९७००२३

* स्थानिक संपादक :- प्रवीण बतकी * (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

